पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.

मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १७**

**सभावृत्तांत**

दिनांक :- ०५/०२/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०५/०२/२०१४ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. सुपे आशा रविंद्र
२) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
३) मा. ननवरे जितेंद्र बाबा
४) मा. उषा संजोग वाघेरे (पाटील)

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.शिंपी - नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.शांताराम भालेकर

सन्मा.माजी नगरसेवक एन.आर.शिंदे यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

----------

दिनांक १५/०१/२०१४ व २२/०१/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १६)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ५७ विषय क्रमांक - १

दिनांक - ०५/०२/२०१४

सूचक – मा.शांतराम भालेकर अनुमोदक – मा.जितेंद्र ननवरे

संदर्भ : १) मा.चारुशिला कुटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय - आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर योजनेनुसार आकुर्डी येथील सर्वे नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आलेले असल्याने फेरबदलाची कार्यवाही करुन सदरचा प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत.....

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५८ विषय क्रमांक - २

दिनांक - ०५/०२/२०१४

सूचक – मा.जितेंद्र ननवर अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ : १) प्रभाग अधिकारी अ प्रभाग यांचेकडील पत्र क्र.अप्र/११/कावि/२४/२०१४, दि.१५/१/१४

२) अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २२० दिनांक ०८/०१/२०१४

विषय - पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सन १९९५ च्या विकास आराखडयानुसार आकुर्डी येथील स.नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. १८ गुंठे रिकाम्या जागेचे भूसंपादन प्रक्रीया सुरु करणेस व ज्या जागेमध्ये बांधकामे झालेली आहेत ती जागा आरक्षणामधून वगळणेबाबत....

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९ विषय क्रमांक - ३

दिनांक - ०५/०२/२०१४ विभाग – नगररचना व विकास

सूचक – मा.जितेंद्र ननवर अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१०/६२९/२०१४, दि.१८/०१/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नव्याने समाविष्ट करावयाच्या तरतूदींचा नियम क्र.१२.१ “ए”, परिशिष्ट “आर” मध्ये ४ (ए) व आर ४ (बी) समावेश करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७

अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुरु करणे, नागरिकांच्या हरकती / सुचना मागविणे, त्यानुषंगाने सुनावणी घेणे व तदनंतर त्यावर निर्णय घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनास सादर करणेकरीता आयुक्तांना अधिकार देणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुपे आशा रविंद्र )**
**सभापती**
मा.शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १४१ /२०१४
दिनांक - ०७/०२/२०१४

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.